# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 13/08/2023 (रविवार)

## अवैध्य मोहाफुल रसायण साठयावर स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कारवाई

दिनांक १३/०८/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पो.स्टे. मौदा हद्दीतील माथनी शिवारात अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असताना त्यांना मुखबीर कडुन मिळालेल्या माहिती वरून माथनी शिवारात मोहाफुल गावठी भट्टीवर रेड केली असता फरार आरोपी नामे— रोहीत पुरूषोत्तम वाढवे रा. वडोदा तह. मौदा जि. नागपूर या नावाचा इसम दगड विटाच्या चुलीवर अवैधरीत्या मोहाकुल गावठी दारूची भट्टी तयार करून दारू गाळत असल्याबाबत गोपनिय बातमी मिळाल्यावरून स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण येथील स्टाफने नमुद घटनास्थळी अवैध मोहाफुल दारू भट्टीवर छापा मारून स्थाचे ताब्यातून १) ३००० हजार लीटर मोहफुल सडवा रसायन एकूण किमती अंदाजे ०७ लाख ५० हजार रू. २) मोहाफुल दारू गाळण्याचे इतर साहित्य किंमती ०१ हजार ५० रू. असा एकूण ०७ लाख ६० हजार ५० रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी विरुद्ध पोलीस ठाणे मौदा येथे अप. क्र. ७३८/२०२३ कलम ६५ (ई) (क)(फ) (ब) म.दा.का. कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त मुद्देमाल व कागदपत्रे पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे मौदा यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे सपोनी अनील राऊत , पोलीस हवालदार विनोद काळे, नाना राऊत, ईकबाल शेख पोलीस नायक संजय बरोदिया चालक मोनू शुक्ला यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर